# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 12 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १२ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- आगामी आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प येत्या एक फेब्रुवारीला रविवारी सादर होणार
- राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्यास सर्वोच्च न्यायालयाची परवानगी
- महापालिका निवडणुकीत मतदारचिठ्ठी वाटपासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

आणि

- राजमाता जिजाऊसाहेब तसंच स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र अभिवादन

****

आगामी आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प येत्या एक फेब्रुवारीला रविवारी संसदेत सादर होणार आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. एक फेब्रुवारीला सकाळी अकरा वाजता अर्थसंकल्प सादर होणार असल्याचं, बिर्ला यांनी सांगितलं. २८ जानेवारीपासून संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार असून, दोन टप्प्यात चालणाऱ्या या अधिवेशनाचं पहिलं सत्र २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारीपर्यंत तर दुसरं सत्र नऊ मार्च ते दोन एप्रिलपर्यंत चालणार आहे.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयानं आज दिली. मतदान यंत्रांची कमतरता, प्रशासकीय अडचणी यासारखी कारणं देत राज्य

निवडणूक आयोगानं ३१ जानेवारीची मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून द्यावी, अशी विनंती केली होती. आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. उर्वरित २० जिल्हापरिषदांच्या निवडणुकांच्या संदर्भात २१ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे.

****

येत्या पंधरा तारखेला राज्यात महापालिकांसाठी मतदान होणार आहे. सर्व मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता, आपल्या मताधिकाराचा निर्भयपणे वापर करावा, असं आवाहन ज्येष्ठ अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी आकाशवाणीच्या माध्यमातून केलं आहे. त्या म्हणाल्या –

**बाईट – मृणाल कुलकर्णी**

****

दरम्यान महापालिका निवडणुकीसाठी प्रचाराचे आता शेवटचे काही दिवस राहिले आहेत. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांचे उमेदवार तसंच अपक्ष उमेदवारांनीही प्रचार यंत्रणेला वेग दिला आहे. फिरत्या वाहनांवरून होणाऱ्या प्रचारासोबतच मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीगाठींवर अधिक भर दिला जात आहे.

****

बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या अनुषंगाने स्वीप उपक्रमांतर्गत आज अंधेरी रेल्वे स्थानक आणि ओशिवराच्या इन्फिनिटी मॉलमध्ये फ्लॅशमॉब घेण्यात आला. तरुणांना आकर्षित करणाऱ्या या माध्यमातून मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली.

****

मतदान प्रकियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज होत आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणूक विभागाने कर्तव्यावर असलेल्या मतदारांसाठी आज टपाली मतपत्रिका वितरित केल्या. सर्व प्रभागांमध्ये मिळून दोन हजार २२८ टपाली मतपत्रिका वितरित केल्याचं, महापालिकेकडून सांगण्यात आलं आहे.

****

मतदारांना पोलचिट अर्थात मतदारचिठ्ठी वाटपासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिका प्रशासनाने यासाठी वॉट्सअ‍ॅपचा मोबाईल क्रमांक जारी केला आहे. ९७ ६४ ८३ ११ ११ या क्रमांकावर मतदाराने हाय असा

मेसेज करून आपला मतदार ओळखपत्र क्रमांक टाकल्यास, मतदान केंद्रासह सर्व माहिती वॉटस्‌अ‍ॅपवर उपलब्ध होणार आहे.

लातूर महानगरपालिका प्रशासनाने मतदारांना विशेष ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या ऑनलाईन सुविधेमार्फत मतदारांना मतदान केंद्राची माहिती मिळेल, तसंच आपला मोबाईल क्रमांक दिल्यास मतदार चिठ्ठी उपलब्ध होणार आहे. यासाठी मतदारांनी https कोलन laturcity डॉट in या लिंकचा वापर करावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

राजमाता जिजाऊसाहेब यांची ४२८वी आणि स्वामी विवेकानंद यांची १६३वी जयंती आज साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन्, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांना आदरांजली वाहिली आहे.

आजच्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्तानं नवी दिल्लीत आयोजित विकसित भारत युवा नेतृत्व संवाद कार्यक्रमाच्या समारोप सत्रात पंतप्रधान सहभागी झाले आहेत. देशभरातून आलेल्या सुमारे तीन हजार तरुणांशी, तसंच आंतरराष्ट्रीय समुदायांच्या युवा प्रतिनिधींशी पंतप्रधान संवाद साधणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.
बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा इथे राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात असलेल्या जिजाऊंच्या जन्मस्थळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडली. यावेळी राजे लखुजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव, आमदार मनोज कायंदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.
छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपजिल्हाधिकारी रुपेश शिनगारे यांच्या हस्ते जिजाऊ तसंच विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार करुन अभिवादन करण्यात आलं.

शहरात या निमित्ताने वाचन उपक्रम, स्वच्छता अभियान तसंच वृक्षारोपण अभियान राबवण्यात आलं, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचं वाटप करण्यात येत आहे. विविध शाळेतल्या विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली. तसंच युवकांची दुचाकी, चारचाकी वाहन फेरी देखील काढण्यात आली.

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी, राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

परभणी इथे राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचं औचित्य साधून महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनजागृती करण्यासाठी 'वोट फॉर परभणी' या पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं.

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज यवतमाळ इथे स्वामीजींच्या अठरा फूट उंचीच्या पुतळ्याचं अनावरण झालं. सामका आयुर्वेद केंद्राच्या आवारात उभारलेल्या या पुतळ्याचं अनावरण रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी राघवेन्द्रानंद महाराज यांच्या हस्ते करण्यात आलं.

****

केंद्र सरकारने नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं आहे. यामुळे शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे शाश्वत उत्पन्न अधिक बळकट होण्यास मदत मिळेल अशी अपेक्षा अहिल्यानगर जिल्ह्यातील लाभार्थी दादासाहेब म्हस्के यांनी व्यक्त केली. ते म्हणाले –

**बाईट – दादासाहेब म्हस्के**

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शहरातल्या महात्मा गांधी मिशन विद्यापीठात आज रस्ता सुरक्षा अभियानाचा प्रारंभ केला. वाहन चालवताना रस्ता सुरक्षा नियमांचं पालन करणे, हे प्रत्येकाचं कर्तव्य असल्याचं स्वामी यांनी यावेळी सांगितलं.

****

महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर शहरातील बार्शी रोड वरील वाहतुक मार्गात १४ ते १६ जानेवारी दरम्यान बदल करण्यात आल्याचं प्रशासनातर्फे कळवण्यात आलं आहे. तरी सर्व नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचं आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे.

****

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं बेकायदेशीर दारूसाठा आणि कारसह आठ लाख २७ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. देवपूर इथं नाकाबंदी दरम्यान ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गंगापूर इथं येत्या १६ तारखेला हिंदू संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर आज ध्वजारोहण करून वाहनफेरी काढण्यात आली. गंगापूर इथं जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर येत्या शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता हे संमेलन होणार आहे.

****

दिल्लीत आज तापमानात लक्षणीय घट झाली असून, तिथे आज दोन पूर्णांक नऊ दशांश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सर्वांत कमी एक पूर्णांक एक दशांश सेल्सिअस तापमान अमृतसर इथं, तर राजस्थानात चुरूमध्ये एक पूर्णांक तीन दशांश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं.

****